सत्र खटला क्रं. ११/२०२१
सरकार ..वि.. पवन
निशाणी क्रं. ३१२
साक्षीदार क्रं २ ची साक्ष

**<u>उलट तपास आरोपी क्र १ ते ४ तर्फे ॲड. एस.एस. जोशी.</u>**

**९६.** मला आवश्यक्ता भासल्यास मी अभिलेख पाहण्यासाठी परवानगी मागेल. दिनांक २८.०३.२०२० रोजी मी पोलीस ठाण्यात जाण्यापूर्वी आरोपी व पोलीसांमध्ये काही चर्चा झाली होती किंवा कसे याची चौकशी केली नाही. त्यादिवशी माझेसमोर हजर केलेल्या आरोपीच्या मानसीक स्थितीबाबत मी चौकशी केली नाही. मी आरोपीवर काही दबाव आहे किंवा कसे याची चौकशी केली नाही.

**९७.** माझी सहमती लेखी स्वरूपात घेतली नव्हती. माझे सहमतीबाबत मजकूर पंचनाम्यात लिहीलेला आहे. मी सदर मजकूराची शहानिशा केली होती. पंचनाम्यामध्ये मी व पोलीसांनी आरोपीला प्रश्न केल्याबाबत मजकूर लिहीला किंवा कसे मला आठवत नाही. मला आरोपी चेह-याने माहीत होता. दिनांक २८.०३.२०२० पुर्वी आरोपीच्या संदर्भात काही पंचनामा केला होता किंवा कसे हे मला आठवत नाही. मला दिनांक २८.०३.२०२० पुर्वी आरोपी शाम उर्फ स्वप्नील पुरुषोत्तम नाटे यांचे नाव माहीत नव्हते.

**९८.** पोलीस ठाण्यात केलेल्या पंचनाम्यामध्ये मी व पोलीसांनी आरोपीला विचारलेले प्रश्न नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निवेदन पंचनाम्यामध्ये अटकेच्या तारखेत दुरुस्ती केली आहे. मी पंचनाम्यात केलेल्या दुरूस्तीच्या ठिकाणी सही केलेली नाही. प्रश्नः- आरोपीच्या वकीलांनी साक्षीदारास त्याने जबाबाच्या सत्यतेबाबत निवेदन पंचनाम्यावर शेरा मारला आहे काय असा प्रश्न विचारला ? उत्तर:- मी निवेदन पंचनाम्यावर सही केली आहे.

न्यायालयाची वेळ झाल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरी/-

(आर.आर. पटारे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
अकोट.

दिनांक: २२/०४/२०२६

सत्र खटला क्रं. ११/२०२१
सरकार ..वि.. पवन
निशाणी क्रं. ३१२
साक्षीदार क्रं २ ची साक्ष

**उलट तपास आरोपी क्र १ ते ४ तर्फे अॅड. एस.एस. जोशी.**

**९९.** मी मेमोरँडम पंचनाम्यावर त्याचे सत्यते बाबत शेरा केली नाही. माझ्या मते आरोपीने मेमोरँडम पंचनाम्याचे वेळी तथाकथीत हत्यार ठेवल्याची जागा सांगितली नव्हती. मी मेमोरँडम पंचनाम्याचे सत्यते बाबत कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मेमोरँडम पंचनाम्याचे सत्यते बाबत मी पोलीसांचे सांगण्यावरुन कथन केले आहे.

**१००.** वकीलांनी साक्षीदारास दाखवतो व काढुन देतो हे भिन्न शब्द आहे असा प्रश्न केला. शब्दांचा अर्थ साक्षीदाराकडुन घेणे अपेक्षित नसल्याने प्रश्न नामंजुर. हे म्हणणे खरे आहे की, मेमोरँडम पंचनाम्यामध्ये नि.क्रं.३८१ मधील आरोपीने हत्यार दाखवतो असे सांगितले बाबत उल्लेख केलेला नाही.

न्यायालयाची वेळ झाल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरी/-

(आर.आर. पटारे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
अकोट.

दिनांक: ०६/०५/२०२६